# मिरा-भाईंदर महानगरपालिका तर्फे मिरा भाईंदर @२०४७ चे आयोजन

मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या वतीने मिरा भाईंदर @२०४७ या परिषदेचे आयोजन दिनांक 9 आणि 10 फेब्रुवारी दरम्यान भारतरत्न, गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृह, मीरा रोड ईस्ट येथे करण्यात आले आहे. या दोन दिवसीय परिषदेमध्ये विविध क्षेत्रातील तज्ञ मान्यवर शिक्षण, महिला सक्षमीकरण, सिटी ब्रँडिंग, शहर सुरक्षा, पर्यावरण आणि आरोग्य यांसारख्या विषयांवर, महानगरपालिकेची भविष्यातील वाटचाल कशी असावी यावर आपली मतं व्यक्त करणार आहेत. देशाचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या विकसित भारत @२०४७ अंतर्गत, महानगरपालिकेची भविष्यातील वाटचाल, शहराचे इन्फ्रास्ट्रक्चर सुधारावे आणि येणाऱ्या काळात शहराची विद्येचे माहेरघर ही ओळख अधिक प्रचलित व्हावी अशा व्यापक उद्देशाने, या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

मिरा भाईंदर @२०४७ परिषदेचे उद्घाटन ९ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मिरा भाईंदरचे महानगरपालिका आयुक्त श्री.संजय श्रीपतराव काटकर, एनएमआरडीए महानगर आयुक्त श्री.सतिशकुमार खडके, कोकण विभागाचे अतिरिक्त विभागीय आयुक्त श्री.विकास पानसरे, वसई विरारचे महानगरपालिका आयुक्त श्री.अनिलकुमार पवार यांची उपस्थिती असणार आहे.

दिनांक ९ फेब्रुवारी रोजी पहिल्या सत्रात महिला सबलीकरण या विषयावर मराठीतील सुप्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक, गीतकार श्री.अरविंद जगताप हे पुरुषांच्या नजरेतून महिला सक्षमीकरण या विषयावर संवाद साधतील. तसेच व्हीआयएन मॅनेजमेंट कन्सलटंटच्या अध्यक्ष डॉ.विनया शेट्टी महिलांसाठी डिजिटल सबलीकरण या विषयावर तर ग्लोबल ब्रँड बिल्डिंग कन्सलटंट आणि बूकवाला नावाच्या एनजीओच्या बोर्ड मेंबर प्रीथी मारोली या नेतृत्व करणाऱ्या महिलांची भूमिका या विषयांवर आपले विचार व्यक्त करतील. दुसऱ्या सत्रात मार्केटिंग गुरु आणि टेडएक्सचे वक्ते श्री.तरूनसिंग चौहान शाश्वत शहर ब्रँडिंग या विषयावर संवाद साधतील. तसेच महाराष्ट्राचे निवृत्त पोलीस महासंचालक श्री. डी.सिवानंदन हे सुरक्षित शहर या विषयावर संवाद साधतील.

१० फेब्रुवारीला सकाळी १० ते 11 या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशीच्या पहिल्या सत्रात भारत सरकारचे माजी सचिव आणि राजदूत असलेले डॉ.ज्ञानेश्वर मुळे हे पर्यावरण आणि युवक या विषयावर आपले विचार व्यक्त करतील. दुपारच्या सत्रात जागतिक दर्जाचे शिक्षणतज्ञ आणि टेडएक्सचे व्याख्याते श्री. फ्रान्सिस जोसेफ हे शैक्षणिक धोरण आणि सुधारणा व शिक्षणावरील तंत्रज्ञानाचा प्रभाव या विषयांवर तर एमजीएम विद्यापीठाचे आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा शिक्षणतज्ञ श्री. सुधीर गव्हाणे हे तंत्रज्ञानाचा शिक्षणावरील प्रभाव या विषयावर मार्गदर्शन करतील. तसेच तिसऱ्या सत्रात प्रसिद्ध नवजात बालरोग तज्ञ, लेखक, वक्ते डॉ.अमोल अन्नदाते हे शाळेवर आधारित आरोग्य शिक्षण कार्यक्रमाची परिणामकारकता या विषयावर आपले मत व्यक्त करतील.

सायंकाळी ०४:१५ वाजता समारोह समारंभ सुरू होईल. याप्रसंगी नगरविकासचे प्रधान सचिव डॉ.के.एच.गोविंद राज, मिरा भाईदरचे महानगरपालिका आयुक्त श्री. संजय श्रीपतराव काटकर आणि वसई विरार, मिरा भाईंदरचे अतिरिक्त पोलिस आयुक्त श्री. श्रीकांत पाठक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. सदरील परिषदेला आवर्जून उपस्थित राहावे अशी विनंती मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आली आहे. ज्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य होणार नाही ते महानगरपालिकेच्या फेसबूक आणि यू ट्यूब हँडलवर ऑनलाईन सुद्धा परिषदेमधील परिसंवाद पाहू शकतात.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
### प्रेसनोट

- **महाराष्ट्र शासनाच्या"माझी वसुंधरा" अभियान अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत विविध स्पर्धांचे आयोजन**
- **पर्यावरण संवर्धन जनजागृतीसाठी ३ दिवसांसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धा व कार्यक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होण्याचे मा. आयुक्त यांचे आवाहन**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य शासनामार्फत सुरू करण्यात आलेल्या "माझी वसुंधरा" अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती करणेकामी या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून महानगरपालिकामार्फत दिनांक ०९ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०२४ पर्यंत पर्यावरणाशी निगडित विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

दिनांक ०९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या "वसुंधरा महोत्सवाचा" शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. पंचतत्त्वावर आधारित असलेल्या मूल्यांच्या माहितीची जनजागृती करणेकामी महानगरपालिकामार्फत "वसुंधरा महोत्सव" चे आयोजन करण्यात येत आहे. सदर वसुंधरा महोत्सवात पर्यावरण व संस्कृती संवर्धनासाठी विविध प्रकारचे भव्य विक्री प्रदर्शन आयोजन करण्यात येणार आहे. सदर प्रदर्शनामध्ये औषधी वनस्पती, बी-बियाणे रोपे, नर्सरी, आयुर्वेदिक व सौंदर्य उत्पादने, हस्तकला व हॅण्डलुम उत्पादने, विविध प्रकारचे, अलंकार, खाद्यसंस्कृती, पर्यावरण संवर्धन प्रकल्प जसे की सोलार सेल्स, सोलार बॅटरी, EV चार्जिंग पॉइंट्स, रेन वॉटर हार्वेस्टिंग, लाईव्ह फूड काऊंटर इत्यादी श्रेणीतील प्रदर्शन भरवणेकामी १०० स्टॉल्स लावण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी सदर स्टॉल्सना भेट देऊन पर्यावरण व संस्कृती संवर्धनासाठी तयार करण्यात आलेल्या वस्तूंची जास्तीत जास्त खरेदी करावी असे आवाहन महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या वतीने करण्यात येत आहे. त्याचबरोबर मनोरंजनासाठी विविध कलाकार, बालकलाकार, शालेय विद्यार्थी यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ७.०० वाजता शहरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी महिला सशक्तीकरण व स्वच्छता या विषयांशी निर्गडित चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर चित्रकला स्पर्धेत ६वी ते ८वी व ८वी वरील असे दोन गट करण्यात आले असून दोन्ही गटासाठी रोख रक्कम स्वरूपात पारितोषिक ठेवण्यात आले आहेत. दिनांक ११ फेब्रुवारी २०२४ रोजी महानगरपालिका आयोजित किल्ला सायक्लोथॉन २०२४ चा शुभारंभ भाईंदर पश्चिम येथील सुभाषचंद्र बोस मैदान येथे मा. आयुक्त यांच्या हस्ते सकाळी ठीक ६:०० वाजता होणार आहे. स्पर्धेची सुरुवात सुभाषचंद्र बोस मैदान येथून होणार असून सुभाषचंद्र बोस मैदान ते जंजिरे किल्ला ते मॅक्सस मॉल पोलीस चौकी ते पुन्हा सुभाषचंद्र बोस मैदान येथे समाप्त करण्यात येणार असून ही स्पर्धा २१ किमी अंतराची असणार आहे. या सायकल स्पर्धेसाठी महिला व पुरुष असा खुला गट ठेवण्यात आला आहे. त्याचबरोबर विजेत्यांना गटानुसार पारितोषिकाच्या स्वरूपात रोख रक्कम स्वरूपात पारितोषिक देण्यात येणार आहे. स्पर्धेच्या अंतिम टप्प्यात सर्व स्पर्धकांसह महापालिका मा. आयुक्त, सर्व अतिरिक्त आयुक्त, सर्व उपायुक्त, महापालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत "माझी वसुंधराची" हरित शपथ घेण्यात येणार आहे.

कार्यक्रमानिमित्त महिलांसाठी "पैठणीचा खेळ" आयोजित केला असून यामध्ये महिलांसाठी तीन विजेत्या महिलांना पैठणी स्वरूपात पारितोषिक देण्यात येणार आहे. समारोप कार्यक्रमाच्या दिवशी चित्रकला व किल्ला सायक्लोथॉन स्पर्धा विजेत्यांसाठी पारितोषिक वितरण सोहळा आयोजित करण्यात येणार असून कार्यक्रमाची सांगता मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. शहरातील नागरिकांनी पर्यावरण आणि निसर्ग याविषयी संवेदनशील बनणे, नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका आयोजित महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत शहरातील जबाबदार नागरिक म्हणून जास्तीत जास्त नागरिकांनी या ३ दिवसांच्या स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदविण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

ULB code - 802786

स्वच्छ सर्वेक्षण 2024 · विकसित भारत अभियान · Mira Bhayandar @2047

माझी वसुंधरा अभियान 4.0 अंतर्गत

# वसुंधरा महोत्सव २०२४

जागर वसुंधरा संवर्धनाचा, महोत्सव समृद्ध संस्कृतीचा !

**दि. 9 फेब्रुवारी 2024**

**सायं. 6.00 वा. उद्घाटन समारंभ**
**सायं. 7.00 ते रात्री 10.00 वा. ऑर्केस्ट्रा व संगीत संध्या**

ठिकाण - स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, इंद्रलोक, भाईंदर (पू.)

**दि. 10 फेब्रुवारी 2024**

**स. 7.00 ते 9.00 वा. चित्रकला स्पर्धा**
**सायं. 6.00 ते 10.00 वा. जादूचे प्रयोग, विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम**

ठिकाण - स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, इंद्रलोक, भाईंदर (पू.)

**दि. 11 फेब्रुवारी 2024**

**स. 6.00 ते 10.00 वा. सायक्लोथॉन 2024**

ठिकाण - सुभाषचंद्र बोस मैदान ते जंजिरे किल्ला ते मॅक्सस मॉल पोलीस चौकी ते सुभाषचंद्र बोस मैदान.

**सायं. 6.00 ते 10.00 वा.महिलांसाठी विशेष होम मिनिस्टर, पैठणी कार्यक्रम.**
**बक्षीस वितरण समारंभ, महोत्सवाची सांगता**

ठिकाण - स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, इंद्रलोक, भाईंदर (पू.)

**दि. 9, 10, 11 फेब्रुवारी 2024**

**स. 10.00 ते सायं. 10.00 वा भव्य प्रदर्शन व विक्री**

ठिकाण - स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, इंद्रलोक, भाईंदर (पू.)

### मान्यवरांच्या शुभहस्ते

**मा.ना. श्री शंभूराज देसाई**
राज्य उत्पादन शुल्क मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा
पालकमंत्री - सातारा आणि ठाणे जिल्हा

**मा.ना. श्री रवींद्र चव्हाण**
मंत्री, सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र राज्य

### यांच्या उपस्थितीत

**मा.श्री.राजन विचारे** (लोकसभा सदस्य , ठाणे जिल्हा)
**मा.श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे** (विधान परिषद सदस्य)
**मा.श्री.निरंजन डावखरे** (विधान परिषद सदस्य)
**मा.श्री.प्रताप सरनाईक** (विधानसभा सदस्य - ओवळा माजिवडा)
**मा.श्रीम.गीता जैन** (विधानसभा सदस्य-मिरा भाईंदर)

**मा.श्री.प्रवीण दराडे** (भाप्रसे) प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व महाराष्ट्र शासन
**मा. श्री.के.एच.गोविंदराज** (भाप्रसे) प्रधान सचिव 2, नगरविकास विभाग, महाराष्ट्र राज्य
**डॉ. महेंद्र कल्याणकर** (भाप्रसे) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग
**मा.श्री.अशोक शिनगारे** (भाप्रसे) मा.जिल्हाधिकारी, ठाणे
**मा.श्री.संजय काटकर** (भाप्रसे) मा. आयुक्त तथा प्रशासक, मिरा भाईंदर मनपा

### निमंत्रक

**श्री.अनिकेत मानोरकर** अतिरिक्त आयुक्त
**श्री.संभाजी पानपट्टे** अतिरिक्त आयुक्त
**श्री.मारुती गायकवाड** उपायुक्त (मुख्यालय)
**श्रीमती कल्पिता पिंपळे** उपायुक्त (उद्यान विभाग)
**श्री.संजय शिंदे** उपायुक्त (पर्यावरण विभाग)
**श्री.रवि पवार** उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग)
**श्री.दिपक खांबित** शहर अभियंता मिरा भाईंदर मनपा

**वसुंधरा महोत्सवात सहभागी होऊया, मिरा-भाईंदरला हिरवेगार करण्याचा संकल्प करूया.**

सदर कार्यक्रम मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकृत फेसबुक पेजवर लाईव्ह MBMCOnline असणार आहे.